# रामाचा शेला

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**रामाचा शेला : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २१०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# रामाचा शेला

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | अभागिनी | ७ |
| २. | बाळ, तू मोठा हो | १८ |
| ३. | प्रेमाची सृष्टी | ३१ |
| ४. | आई गेली | ६४ |
| ५. | पंढरपूर | ७५ |
| ६. | आशा-निराशा | ९२ |
| ७. | कुंटणखाना | ११३ |
| ८. | उदय | १२७ |
| ९. | गब्बूशेट | १४२ |
| १०. | आजोबा व नातू | १५२ |
| ११. | सनातनींची सभा | १७१ |
| १२. | भेट | १९३ |
| १३. | समारोप | २०९ |

✦✦

# अभागिनी

सरला आपल्या खोलीत रडत बसे. या जगात आपल्याला कोणी नाही असे तिला सदैव वाटे आणि खरोखरच तिला कोण होते? आई नाही म्हणजे कोणी नाही. आईची उणीव कशाने तरी भरून येणे शक्य आहे का? किती झाले तरी आई ती आई. सरला आठ वर्षांची होती तेव्हा तिची आई हे जग सोडून गेली. तिचे वडील होते; परंतु ते कठोर स्वभावाचे होते. सरलाशी प्रेमाने ते कधी बोलत नसत. का बरे असे? आईपेक्षा पिता जरी कठोर असला तरी त्याचे का मुलांवर प्रेम नसते? बाहेरून दिसले नाही तरी पित्याच्या अंतरंगात का ओलावा नसतो? बाहेरच्या व्यवहारी जगात सदैव वागावे लागत असल्यामुळे पुरुषांची मने का कठोर होतात? काही असो. विश्वासरावांचे सरलेवर प्रेम नव्हते ही गोष्ट खरी. निदान तसे दिसत तरी असे.

सरला विश्वासरावांचे पहिले अपत्य. तिच्या पाठीवर झालेले एकही मूल जगले नाही. सरलाला ना भाऊ ना बहीण. आणि सरलाची आईही शेवटी एका बाळंतपणानंतर वारली. सरस्वतीबाई सरलाला सोडून गेल्या. मरताना त्या पतीला म्हणाल्या, ''तुम्ही पुन्हा लग्न करा. सरला लहान. स्वत:चे हाल नका करू.''

परंतु काही वर्षे विश्वासराव तसेच राहिले. त्यांचे संसारातून लक्ष जणू उडाले. त्यांनी प्रकृती अस्वास्थ्याचे कारण दाखवून लवकरच पेन्शन घेतली आणि पुण्याला एक लहानसा बंगला बांधून तेथे ते राहिले. सरला आणि विश्वासराव दोनच माणसे. बंगल्यात बिऱ्हाडाला जागा ते देत नसत. माणसांचा जणू त्यांना तिटकारा असे. त्यांना कोणी मित्रही नव्हता. आप्तेष्टही कधी कोणी येत नसे. बंगल्याभोवती फुले फुलवण्याचा त्यांना विलक्षण नाद. त्यातच त्यांची सकाळ-संध्याकाळ जाई. फुलांकडे ते पाहात राहायचे. तऱ्हेतऱ्हेची सुंदर फुले, शोभेची फुले, सुगंधी फुले. रस्त्यातून जाणारे-येणारेही त्या फुलांकडे पाहात राहात. कमानीवरील फूलवेलीकडे पाहात राहात.

विश्वासराव फुलांची काळजी घेत; परंतु सरलेची काळजी घेत नसत. फुले किती हळुवारपणे ते फुलवीत; परंतु सरलेशी ते कठोरपणे वागत. ते फुलांशी बोलत, त्यांना कुरवाळीत; परंतु सरलेशी ते प्रेमाने बोलत नसत, तिला कधी जवळ घेत नसत. तिच्या केसांवरून वात्सल्याचा हात फिरवीत नसत. ते तिला जेवू-खाऊ घालीत. तिला कपडेलत्ते पुरवीत. शाळेत पाठवीत, पुस्तके देत; परंतु प्रेम देत नसत. सरलेला प्रेमाशिवाय सारे काही मिळत असे.

एखाद्या वेळेस ती जर फुलझाडांना पाणी घालू लागली तर विश्वासराव रागावत.

''तू नकोस पाणी घालू.'' ते म्हणत.

''का हो बाबा?'' ती खिन्नतेने विचारी.

''तू पाणी घातलेस तर ती फुले मरतील. ती झाडे सुकून जातील.''

''माझे हात का विषारी आहेत?''

''असे एखाद्या वेळेस वाटते.''

''मग तोडून टाका हे हात! मारून टाका मला!''

''ते देवाच्या हाती.''

सरला आपल्या खोलीत जाऊन रडत बसे. ती हातात चाकू घेई परंतु बोटे तोडण्याचे तिला धैर्य होत नसे. एखाद्या वेळेस पित्याच्या नकळत ती त्या फुलांजवळ जाई, त्यांच्यावरून हात फिरवी, फुले सुकून जातात की काय ते ती पाही; परंतु फुले सुकून जात नसत. ती आनंदी दिसत, नाचत, डोलत. सरलेचे



मुखपुष्प पाहून जणू त्या फुलांना आनंद होई परंतु सरलेला रडू येई. तिच्या डोळ्यांतील पाणी फुलांवर पडे. ती फुले कावरीबावरी होत.

सरलेच्या फार मैत्रिणीही नव्हत्या. तिचा स्वभाव घुमा झाला होता. मनाचा मोकळेपणा नाहीसा झाला होता. ती कधी कधी एकटीच फिरायला जात असे. एकटीच टेकडीवर जाऊन बसत असे. एकटीच कालव्याच्या काठी बसत असे. बाभळीची ती सुंदर पिवळी फुले तिला फार आवडत. त्यांचा मंद वास तिला आवडे. ती मनात म्हणे, ''या काटेरी बाभळीसही अशी सुंदर सुकुमार फुले यावीत. परंतु माणसांची मने कठोर का असावीत?''

एखाद्या वेळेस तिला घरी यायला उशीर झाला तर पिता रागे भरे. एके दिवशी तर ती बऱ्याच उशिराने आली.

''सिनेमाला गेली होतीस की काय ?''

''नाही.''

''मग एवढा वेळ कोठे होतीस?''

''कालव्याच्या काठी बसले होते.''

''एकटीच?''

''दुसरे कोण आहे मला?''

''तेथे बसून काय करीत होतीस?''

''आईला आठवीत होते, रडत होते.''

''घरात नाही वाटते रडता येत?''

''रडायलाही तुमची भीती वाटते.''

''उद्यापासून उशीर झाला तर बघ. या घरात राहायचे असेल तर आठच्या आत फिरून आलेच पाहिजे.''

असे दिवस जात होते. परंतु अकस्मात विश्वासरावांनी पुन्हा लग्न केले. एका विधवेशी त्यांनी पुनर्विवाह केला. बंगल्यात नवीन माणूस आले. रमाबाई आनंदी होत्या. सरलेजवळ त्या पुष्कळ बोलत. प्रथम प्रथम त्यांनी पुष्कळ प्रेमही दाखविले. सरलेच्या केसांत त्या फुले घालीत. त्या तिला सिनेमाला घेऊन जात. सरला जरा सुखी दिसू लागली. विश्वासरावही सरलेशी प्रेमाने बोलू लागले.

‘‘सरले, ये पाणी घालायला.’’

‘‘फुले सुकतील हो बाबा.’’

‘‘आता नाही सुकणार.’’

‘‘का बरे?’’

‘‘असे वाटते खरे.’’

सरला पाणी घाली. तिचे हृदय आनंदाने भरून येई. तिची आंतरिक फुलबागही फुलू लागली. जेथे आत्तापर्यंत केवळ उजाड ओसाड रान होते तेथे सुखाचे, स्नेहाचे, केवळ भावनांचे मळे फुलू लागले. जीवनात आनंद व सुगंध आला.

घरात आता फोनोग्राफ आला होता. सरला सुंदर सुंदर प्लेट लावी. रमाबाई झोपाळ्यावर बसून ऐकत.

‘‘आई, आता कोणती लावू?’’

‘‘तुला आवडेल ती लाव.’’

‘‘मला साऱ्याच आवडतात.’’

‘‘मलाही.’’

असे संवाद चालत.

कधी कधी रमाबाई व सरला दोघी फिरावयाला जात. एके दिवशी दोघी कालव्याच्या काठी बसल्या होत्या आणि एकाएकी सरलेचे डोळे भरून आले.

‘‘काय गं झाले, सरले? रडतेसशी?’’

‘‘मला एक आठवण झाली.’’

‘‘कशाची?’’

‘‘येथे अशीच मी एकदा बसले होते. आईची आठवण आली होती. मला कोणी नाही असे वाटत होते. मी किती वेळ बसले त्याचे भानही नाही राहिले. उशिरा घरी गेले. बाबा रागावले. ते सारे पुन्हा आठवले.’’

‘‘पूस डोळे. वेडी कुठली! आता मी आहे ना तुला?’’

‘‘तुम्ही कराल माझ्यावर प्रेम? कराल का माया? मी तुम्हाला आई म्हणते. व्हाल ना माझी आई? तुम्ही प्रेम करता म्हणून बाबाही करू लागले आहेत. ते पूर्वी मला फुलझाडांसही पाणी घालू देत नसत. म्हणत की ती झाडे सुकतील. आई, माझे हात का असे पापी आहेत? बघ ना.’’



रमाबाईंनी सरलेचे हात प्रेमाने जवळ घेतले. त्यांनी आपल्या पदराने तिचे डोळे पुसले.

‘‘मी देईन हो तुला प्रेम. मी होईन तुझी आई. सावत्र नव्हे तर सख्खी आई. इतके दिवस तू एकटी होतीस; आता एकटी नाहीस. हसत जा. रडत नको जाऊस. समजलीस ना?’’

आणि जवळ असणाऱ्या मळ्यातल्या आम्रवृक्षावरील कोकिळा कुहू करून ओरडली. सरला आनंदली. तीही कुहू कुहू करू लागली. कोकिळा चिडली; ती रागाने कुहू करू लागली.

‘‘कशी चिडून ओरडते आहे?’’ रमाबाई म्हणाल्या.

‘‘पशुपक्ष्यांनासुद्धा समजते. त्यांना रागलोभ समजतात ना आई?’’

‘‘चल आता जाऊ.’’

‘‘ही कोकिळा काय म्हणते आई?’’

‘‘मला नाही माहीत.’’

‘‘मला आहे माहीत.’’

‘‘सांग.’’

‘‘ती म्हणते, ‘प्रेम, कुठे आहे प्रेम? कुहू, कुहू, प्रेम कुठे आहे प्रेम? कुहू कुऊ’ असे ती विचारीत आहे.’’

‘‘तू तिला काय उत्तर देशील ?’’

‘‘आहे, माझ्या आईजवळ प्रेम आहे. या नव्या आईजवळ प्रेम आहे.’’

‘‘वेडी आहेस तू. चल घरी जाऊ.’’

रमाबाईंचे प्रेम मिळाल्यापासून सरलेच्या जीवनात फरक पडला. ती नाचू खेळू लागली, वर्गातील मुलींशी बोलू लागली. त्यांना खाऊ देऊ लागली. ती कधी कधी फराळाचे नेई, इतर मुलींना देई. तिच्या हृदयाचे दार आजपर्यंत जणू बंद होते, हृदयातील झऱ्याच्या तोंडावर जणू दगड होता, परंतु आता दार उघडले होते. झऱ्याच्या तोंडावरचा दगड दूर झाला होता. दबलेल्या, प्रेमळ, कोमल भावना वाहू लागल्या. पिंजऱ्यातील पक्षी मोकळा होऊन नाचू-गाऊ लागला.

रमाबाईंना आता काही दिवस गेले होते.

‘‘सरले, तुला भाऊ हवा की बहीण?’’ विश्वासरावांनी विचारले.

''भाऊ. बहिणीला भाऊ.''

आणि खरोखरच भाऊ झाला. रमाबाईंना मुलगा झाला. प्रसूतिसदनातून त्या नव्या बाळासह सुखरूप घरी आल्या. सरला बाळाला आंदुळी. त्याला गाणी म्हणे. ओव्या म्हणे. तिचा आनंद आता गगनात मावत नसे. सर्वांपेक्षा ती सुखी होती, आनंदी होती. हा भाऊ जगो, या भावाला आयुष्य कमी न पडो, असे ती सारखी प्रार्थी.

परंतु ती प्रार्थना देवाने ऐकली नाही.

बाळ आजारी पडला, तापाने फणफणला. सरलेच्या हृदयाचे पाणी पाणी झाले. ती बाळाजवळ बसून राही. परंतु एके दिवशी वज्राघात झाला. तिचा जीव कासावीस झाला.

''तू बाळाला हात नको लावूस. तू त्याला घेत असे, खेळवीत असे म्हणून तर तो नाही ना आजारी पडला ? खरंच का तुझे हात विषारी आहेत? नको बाई. खरेच नको त्याच्याजवळ तू बसूस. बाळाचे दुखणे जिवावरचे दिसते.'' रमाबाई म्हणाल्या.

''आई, खरेच का नको हात लावू?''

''खरेच नको. तेसुद्धा असेच म्हणाले.''

सरला ओक्साबोक्सी रडू लागली. तिला हुंदका आवरेना. ती आपल्या खोलीत गेली. खाटेवर पडून राहिली. अश्रू संपत ना. ''देवा, माझे आयुष्य बाळाला दे. मला अभागिनीला कशाला वाचवितोस? माझा स्पर्श, माझा श्वास जणू विषारी आहे. माझी दृष्टी विषारी आहे. अरेरे! अशी कशी मी? देवा, ने रे माझे प्राण. बाळाचे वाचव.'' असे ती स्फुंदत म्हणत होती.

बाळाचे दुखणे त्या दिवशी अधिक होते. ती काळरात्र होती. विश्वासराव व रमाबाई बसून होती. सरला आपल्या खोलीतून डोकावून बघे. बाळाच्या जवळ जाऊन बसावे अस शतदा तिच्या मनात आले परंतु पुन्हा निराश होऊन ती खाटेवर जाऊन पडे. शेवटी तिने धैर्य केले. ती बाळाजवळ गेली.

''बाबा, बसू का जवळ? मी नाही हो वाईट. माझ्या स्पर्शाने फुलं सुकत नाहीत. बसू का बाळाजवळ? बसू का माझ्या भावाजवळ? आई, बसू का?''



''तुझ्या पाठीवरचे एकही भावंड वाचले नाही. तुझी आईही गेली. हा बाळही आजारी पडला. नको. तू जा. सरले, खरेच जा.'' विश्वासराव म्हणाले.

''बाबा, मी तेवढी वाईट आणि तुम्ही सारे चांगले वाटते? माझे पाप मारीत असेल तर तुमचे पुण्य का नाही कोणाला तारीत?''

''तू जा. बाळ घुटमळत आहे. मरणाच्या दारात आहे. तेथे वाद घालायला काही वाटत नाही का तुला? जा म्हणतो ना. जा !'' विश्वासराव तीव्र स्वराने म्हणाले.

सरला गेली. आणि थोड्या वेळाने बाळही देवाघरी गेला. घरातला आनंद पार मावळला. आता सरलेशी कोणी बोलत नसे. अश्रू फक्त तिचे मित्र होते.

सरला मॅट्रिक पास झाली. पुढे काय?

''बाबा, मला शिकायची इच्छा आहे.''

''शिकणे पुरे. तुझे लग्न ठरवीत आहे.''

''माझे लग्न?''

''हो.''

''ते कशाला बाबा? मी दुर्दैवी आहे. मी विषारी आहे. एका घराण्याचा मी सत्यानाश करीत आहे. आणखी दुसऱ्या घराण्याचा सत्यानाश कशाला करू? नको. बाबा लग्न नको. माझे विद्येशी लग्न लावा. ज्ञानाशी लग्न लावा. मला नको दुसरा सखा, नको कोणी जिवाचा सोबती. बाबा, लग्नाचा विचार मी माझ्या मनातून कधीच काढून टाकला आहे. एवढे तरी माझे ऐका.''

''मी ठरवले आहे लग्न. लग्नाशिवाय राहणे बरे नव्हे. केवळ विद्येशी व ज्ञानाशी लग्न लावून भागत नसते. तू या घरात विषवल्ली असशील; कदाचित दुसऱ्याच्या घरी अमृतवल्ली होशील.''

आणि सरलेचे लग्न झाले.

सरला सासरी गेली. तरुण, सुंदर पती परंतु लग्न होऊन पंधराही दिवस झाले नाहीत तोच पती आजारी पडला. घरातील गोडधोड अद्याप शिल्लक होते. लग्नातील लाडू-करंज्या अद्याप होत्या. तोच पती मरणशय्येवर पडला. सरला देवाला रात्रंदिवस आळवीत होती. पतीजवळ ती बसून होती.